# राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २०/०७/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते व बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

कोंकण विभागात काही ठिकाणी तर लातूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. नाशिक, कोल्हापूर, अमरावती व नागपूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि. १ जून ते २० जुलै कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ४२१.१ मि.मी. असून दि.२० जुलै, २०२० पर्यंत ४३३.३ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०२.९ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.२०.०७.२०१९ अखेर ३६२.५ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ८६.०८ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि. १ जून ते २० जुलै, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | १ | नंदुरबार. |
| ३ | ५० ते ७५ % | ५ | रायगड, पालघर, पुणे, कोल्हापूर, गडचिरोली. |
| ४ | ७५ ते १०० % | १० | ठाणे, नाशिक, सातारा, उस्मानाबाद, नांदेड, अकोला, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | १८ | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, हिंगोली, परभणी, बुलढाणा, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर. |

राज्यात २० जुलै, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी १२ तालूक्यांत २५ ते ५० %, ५४ तालूक्यात ५० ते ७५ %, ८१ तालूक्यात ७५ ते १००% तर २०८ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर हेलिकोव्हर्पा, गर्डल बीटल, खोडमाशी, उंट अळी व तंबाखुवरील पाने खाणारी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, मावा तुडतुडे, ऊस पिकावर हुमणीचा प्रादुर्भाव दिसून आला.

किड व रोगाच्या व्यवस्थापनासाठी शेतीशाळा, कृषि विद्यापीठाकडील पिक संरक्षण सल्ले, योजनांतर्गत फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा इत्यादी माध्यमातून उपाययोजना करण्यात येत असून, या अनुषंगाने प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे.

दि.१७.०७.२०२० अखेरच्या अहवालानुसार राज्यात दि.१६.०७.२०२० अखेरील सप्ताहात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती निरंक आहे.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९९ लाख हेक्टर असून दि.२० जुलै, २०२० अखेर १२४.२० लाख हेक्टर क्षेत्रावर (८७.४७%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३४ लाख हेक्टर असून १२५.१७ लाख हेक्टर क्षेत्रावर (८३%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.१९.०७.२०१९ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १००.९७ लाख हे. (६६.७२%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १००.५७ लाख हे. (७०.८३%) होते.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -**

राज्यात भात तसेच नागली पिकांच्या पुर्नलागवडीची कामे सुरु असून इतर पिकांच्या पेरण्या प्रगतीपथावर आहेत.पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत असून काही ठिकाणी सोयाबीन,भुईमूग व मका पिके फुलोरा अवस्थेत तर बागायती कापूस पिक पाते धरण्याच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची (निंदणीची/कोळपणीची) कामे सुरू आहेत.

**खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता**




**खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता**



**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. आद्रतेच्या प्रमाणात वाढ झाली असून, तपमानात घट झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.२० जुलै, २०२० अखेर २.०९ लाख हेक्टर क्षेत्रावर (४७.२३%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामासाठी भात व नाचणी पिकांची रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण होत आली असून अनुक्रमे ३६,२८१ हे. व ४,३४३ हे. क्षेत्रावर रोपवाटीका पेरणी झालेली आहे.पाऊस समाधानकारक होत असल्याने चिखलणीच्या तसेच भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीच्या कामांना वेग आला आहे. याशिवाय तूर, मूग, उडीद व इतर तेलबिया पिकांच्या पेरणीची कामे सुरु असून पिके उगवणीच्या अवस्थेत आहेत.

**नाशिक विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. हवा दमट होती. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.२० जुलै, २०२० अखेर १८.६३ लाख हेक्टर क्षेत्रावर (८७.९०%) पेरणी झाली आहे. विभागात भात रोपवाटीकेतील रोपे लागवडीच्या अवस्थेत असून लावणीची/चिखलणीची कामे सुरू आहेत.नागली रोपवाटिकेतील रोपे वाढीच्या अवस्थेत असून, लावणी सुरु आहे.ज्वारी, मका, तूर, भुईमूग, तीळ, सुर्यफुल, सोयाबीन व जिरायती कापूस पिकांची पेरणी अंतिम टप्प्यात आहे. पेरणी झालेली पिके वाढीच्या अवस्थेत असून, बागायती कापूस वाढ ते पाते धरण्याच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**पुणे विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.२० जुलै, २०२० अखेर १०.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर (११८.५१%) पेरणी झाली आहे. विभागात भात व नाचणी पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत. तूर, मुग, उडीद, भुईमूग, सुर्यफुल,कापूस व सोयाबीन पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**किड व रोग –**

विभागात मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, खोडमाशी व उंट अळी, कापूस पिकावर मावा तुडतुडे इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.१४ लाख हेक्टर असून दि.२० जुलै, २०२० अखेर ७.४९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१.९९%) पेरणी झाली आहे. विभागात भात व रागी वगळता इतर पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.भात व रागी पुर्नलागवडीची कामे वेगाने सुरु आहेत.धुळवाफ पेर भात वाढ ते फुटव्याच्या अवस्थेत आहे.ज्वारी,बाजरी व कडधान्य पिके वाढीच्या अवस्थेत तर भुईमूग व सोयाबीन पिके वाढ ते फुलोरा अवस्थेत आहेत.नवीन अडसाली ऊसाची लावणी चालू आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची(कोळपणी/निंदणीची) व खते देण्याची कामे चालू आहेत.

**किड व रोग -**

विभागात मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर खोडमाशी व उंट अळीचा तर ऊस पिकावर हुमणीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.२० जुलै, २०२० अखेर १९.७१ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.४२%) पेरणी झाली आहे. विभागात खरिप पिकांच्या पेरणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत असून वाढ समाधानकारक आहे.पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू असून पिक संरक्षणासाठी कृषि विभागामार्फत उपायायोजना सुचविण्यात येत आहेत.

**किड व रोग -**

विभागात मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर हेलिकोव्हर्पा, उंट अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.२० जुलै, २०२० अखेर २४.९५ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९.२८%) पेरणी झाली आहे.विभागात खरीप पिकांच्या पेरणीची कामे प्रगतीपथावर असून, पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**किड व रोग -**

विभागात सोयाबीन पिकावर हेलिकोव्हर्पा, गर्डल बीटल आणि खोडमाशीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवस व रात्रीच्या तपमानात घट झाली असून आद्रतेचे प्रमाण वाढले आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.१३ लाख हेक्टर असून दि.२० जुलै, २०२० अखेर २८.८३ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९.७०%) पेरणी झाली आहे. विभागात पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. तूर,सोयाबीन व कापूस पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**किड व रोग -**

विभागात मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, गर्डल बीटल, तंबाखुवरील पाने खाणारी अळी व खोडमाशीचा, कापूस पिकावर मावा तुडतुडे, गुलाबी बोंड अळी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नागपूर विभाग-**

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.२० जुलै, २०२० अखेर १२.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर (६३.५८%) पेरणी झाली आहे.विभागात सोयाबीन, तूर, कापूस पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत असून काही ठिकाणी कपाशीला पाते धरण्यास सुरूवात झाली आहे तर मका पिक फुलोरा अवस्थेत आहे.काही ठिकाणी कापूस व तूर पिकांमध्ये आंतरमशागतीची (कोळपणी/निंदणीची) कामे सुरु आहेत.

**किड व रोग -**

विभागात कापूस पिकावर मावा तुडतुडे या किडींचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, खोडमाशी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. २०.०७.२०२० पर्यंत पेरणी अहवाल**

**क्षेत्र- हेक्टरमध्ये**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि.१९/०७/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १५०३११९ | ४४९०११ | ५४८७५६ | ३७ | १२२ | २२ |
| २ | खरीप ज्वारी | ४८३२२८ | २१४०९८ | २५५१९९ | ५३ | ११९ | १९ |
| ३ | बाजरी | ६७१५९४ | ३४७६८३ | ५९०८०५ | ८८ | १७० | ७० |
| ४ | रागी | ९५५१० | ३०६८२ | ३३०३७ | ३५ | १०८ | ८ |
| ५ | मका | ८३८४७५ | ५९५९९१ | ८१५६९० | ९७ | १३७ | ३७ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६५ | १५१५४ | १७११६ | ३२ | ११३ | १३ |
| **खरीप तृणधान्य** | | **३६४४५९१** | **१६६७०६६** | **२२६०६०३** | **६२** | **१३६** | **३६** |
| ७ | तूर | १२७४५७६ | ८९१८१५ | ११५७९३८ | ९१ | १३० | ३० |
| ८ | मुग | ४८३६२५ | २४१४५९ | ३६४२०८ | ७५ | १५१ | ५१ |
| ९ | उडिद | ३५९१५३ | २१८३७० | ३३५५७० | ९३ | १५४ | ५४ |
| १० | इतर कडधान्य | १००३४९ | ४३०१८ | ६८५२३ | ६८ | १५९ | ५९ |
| **एकुण कडधान्य** | | **२२१७७०४** | **१४४९२०४** | **१९२६२३९** | **८७** | **१३३** | **३३** |
| **एकुण अन्नधान्य** | | **५८६२२९४** | **३११६२७०** | **४१८६८४२** | **७१** | **१३४** | **३४** |
| ११ | भुईमुग | २०२२९८ | १३८११० | १८०३३२ | ८९ | १३० | ३० |
| १२ | तीळ | २३६८६ | ७७४१ | ७७६३ | ३३ | १०० | ० |
| १३ | कारळ | १९८२७ | ४३०६ | ४५३९ | २३ | १०५ | ५ |
| १४ | सुर्यफुल | १७९८० | ८४४१ | ११७७६ | ६५ | १४० | ४० |
| १५ | सोयाबीन | ३८८०२४४ | २९६५४६० | ३९४७०५९ | १०२ | १३३ | ३३ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८४६ | २६३४ | ३८२१ | २८ | १४५ | ४५ |
| **एकुण तेलबिया** | | **४१५७८८२** | **३१२११९०१** | **४१५५२९०** | **१००** | **१२९** | **२९** |
| **१७** | **कापूस** | **४१७८४११** | **३७२८७०२** | **४०७७७९१** | **९८** | **१०९** | **९** |
| **एकुण पेरणी क्षेत्र** | | **१४१९८५८८** | **१००५६८७३** | **१२४१९९२३** | **८७.५** | **१२३** | **२३** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **४०६१६** | **९६५८७** | **१०** | **२३८** | **१३८** |
| **एकुण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३३७६७** | **१००९७४८९** | **१२५१६५१०** | **८२.७** | **१२४** | **२४** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत